# शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा जानेवारी २०१६ संबंधी कामकाजा संदर्भात केंद्रसंचालक व केंद्रसमन्वयकांना सर्वसाधारण सूचना

## अ) केंद्रसंचालकांसाठी परीक्षा संबंधी सर्वसाधारण सूचना :-

१. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत राज्यातील विविध केंद्रावरुन दिनांक २९, ३०, ३१ जानेवारी २०१६ व १ फेब्रुवारी २०१६ या चार दिवसात शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (जी.सी.सी.-टी.बी.सी. ३० श.प्र.मि.) जानेवारी २०१६ घेण्यात येणार आहे.

२. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे प्रतिनिधी म्हणून आपणास या परीक्षेचे काम करावयाचे आहे.

३. केंद्रसंचालक हे त्यांच्या केंद्रातील परीक्षेच्या संचालनाबाबत प्रमुख जबाबदार अधिकारी आहेत. **परीक्षा कालावधीत केंद्रसंचालक यांनी परीक्षा केंद्रावर पूर्ण वेळ उपस्थित राहणे आवश्यक आहे.**

४. परीक्षा शिस्तपूर्ण वातावरणात पार पाडण्याची, कोणतेही गैरप्रकार या कालावधीत घडणार नाहीत याबाबत काळजी घेण्याची, परिस्थितीनुसार योग्य तो निर्णय तात्काळ घेण्याची व तसे परीक्षा परिषदेस कळविण्याची जबाबदारी केंद्रसंचालकांवर राहील.

५. प्रथमत: परीक्षेसाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य आपणास उपलब्ध असल्याची खात्री करावी. परीक्षेबाबत तांत्रिक सल्लागार म्हणुन विभागीय समन्वयक यांची नेमणुक केलेली आहे, ते खालील प्रमाणे:-

| Sr. no. | Name | Region | Mob. No. | Email Id |
|---|---|---|---|---|
| 1 | YERMALKAR SACHIN | For Aurangabad & Latur region | 9420894812 | sagrolisainik@yahoo.in |
| 2 | MR. J. K. KECHE | For Amravati & Nagpur region | 9850325524 | jkkeche@gmail.com |
| 3 | Sudhir Bhosale | For Pune & Kolhapur region | 9423003512 | sudhir.stb@gmail.com |
| 4 | Satyawan Guram | For Mumbai & Nashik region | 9769494754 | g.satyawan@gmail.com |

तांत्रिक अडचणी आल्यास त्यांच्याशी संपर्क साधावा.

६. सदर परीक्षा प्रती दिवस तीन बॅचेस याप्रमाणे चार दिवसात घेण्यात येणार आहे.

७. **परीक्षा बॅचेसच्या वेळा अनुक्रमे ९.३०, १२.००, २.३० अशा असल्या तरी आपणास परीक्षा केंद्रावर सकाळी ८ वाजेपासुन उपस्थित राहणे आवश्यक आहे.**

८. **परीक्षेच्या आदल्या दिवशी दि. २८/०१/२०१६ रोजी आपण आपणाकडे नेमून दिलेल्या केंद्रावरील केंद्र समन्वयकाशी (I.T. Teacher) संपर्क साधुन परीक्षेची संपुर्ण पुर्वतयारी करुन घ्यावी.**

९. केंद्रावरील बैठक व्यवस्थेची माहिती सूचना फलकावर विद्यार्थी, पालक यांचे माहितीसाठी दर्शनी भागावर लावावी.

१०. आपल्या केंद्रावर कमाल २५ संगणकावर २५ परीक्षार्थी (एक बॅच) याप्रमाणे राहील.

११. शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा इंग्रजी, मराठी व हिंदी माध्यमातून संगणक टंकलेखनाच्या विविध गतींच्या व कौशल्याची परीक्षा आहे.

१२. शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षेसाठी प्रत्येक विषयासाठी एकूण किती परीक्षार्थी केंद्रावर परीक्षेस बसणार आहेत, त्यांची यादी केंद्रसंचालक बैठकीत देण्यात आलेली आहे. या कार्यालयाकडून दिनांकनिहाय, बॅचनिहाय परीक्षार्थीची यादी देण्यात येईल.

१३. परीक्षा सुरु झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा हॉल मध्ये संस्था चालकास किंवा बाहेरील इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश देऊ नये.

१४. सदर परीक्षा कालावधी मध्ये विद्युत पुरवठा खंडित होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी व त्याकरीता पर्यायी व्यवस्था करावी. याबाबत परिषदेकडून आपल्या जिल्ह्याच्या कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमीटेड यांना पत्र दिले आहे.

१५. परीक्षा केंद्रावरील सुव्यवस्था भंग होईल अशा प्रकारचा अथवा तत्सम प्रकारचा गैरप्रकार निदर्शनास आल्यास तात्काळ पुढील कार्यवाही करावी व त्याचा अहवाल परीक्षा संपताच आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे नावे सादर करावा.

१६. या परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी उमेदवारांनी प्रवेशपत्र आणणे आवश्यक आहे. तसेच अन्य कोणतेही फोटो ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. (उदा. पॅनकार्ड, शाळा/महाविद्यालय ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, इत्यादी)

१७. परीक्षार्थ्याला परीक्षेच्या विहीत वेळेच्या ४५ मिनिटे अगोदर परीक्षा कक्षात उपस्थित करुन घ्यावे.

१८. सदर परीक्षा संगणकावर घेण्यात येत असल्यामुळे परीक्षा सुरू झाल्यानंतर परीक्षार्थ्यास परीक्षा कक्षात प्रवेश मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

१९. परीक्षार्थीने मोबाईल फोन, कॅलक्युलेटर, पेजर इ. कोणत्याही प्रकाराचे इलेक्ट्रॉनीक साहित्य किंवा इतर कोणत्याही प्रकाराचे आक्षेपार्ह कागदपत्रे परीक्षा कालावधीत स्वत:जवळ ठेवता येणार नाही. परीक्षाकाळात असे साहित्य जवळ बाळगल्याचे आढळून आल्यास तसेच गैरप्रकार केल्याचे निदर्शनास आल्यास त्या परीक्षार्थी विरुध्द भा.दं.वि. (IPC) अंतर्गत कारवाई करावी.

२०. परीक्षा कालावधीत पुरविलेल्या स्वाक्षरीपटावर परीक्षार्थीची आपल्या नाव व फोटो समोर स्वाक्षरी घ्यावी, अन्यथा परीक्षार्थीची उपस्थिती ग्राह्य धरली जाणार नाही याची परीक्षार्थीला जाणीव करुन द्यावी. परीक्षा कक्षामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे कार्यरत आहेत याची परीक्षार्थींना जाणीव करुन द्यावी.

२१. परीक्षा संपल्यानंतर केंद्रसंचालक व समन्वयक यांच्या परवानगीशिवाय परीक्षार्थ्यास परीक्षा कक्ष सोडता येणार नाही. तसेच संपुर्ण परीक्षा कालावधीत परीक्षार्थ्यास मध्येच परीक्षा कक्षाबाहेर सोडू नये.

२२. कोणत्याही विद्यार्थ्यास कोणत्याही कारणास्तव बॅच बदलून देऊ नये.

**२३. मराठी व हिंदी माध्यमाच्या परीक्षार्थींसाठी परीक्षा सुरू होण्यापुर्वी त्यांना परीक्षेस देण्यात आलेल्या संगणकावर आय.एस.एम. (ISM) सुरु असल्याची खात्री करावी.**

२४. **अंध/ अपंग विद्यार्थ्यांसंदर्भात करावयाची कार्यवाही :-**

१. **अंध विद्यार्थ्यांबाबत :-** अंध विद्यार्थ्यांना इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक) घेऊन बसण्यासाठी शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र.: बीजीई२००१/९३९७५/(१९०/२००१)साशि-१, दि. १०/१०/२००१ नुसार मान्यता दिलेली आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना सनेत्र वाचकाने (मदतनीस) वाक्य, शब्द वाचल्यानंतर ते टंकलिखीत करण्यास उशीर लागण्याची शक्यता लक्षात घेऊन टंकलेखन परीक्षेच्या विभाग २ साठी (गती उतारा) ७ मिनिटांऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यास शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र.: बीईजी२००१/९३९७५/(१९०/२००१)साशि-१, दि. ३१ डिसेंबर, २००१ नुसार मान्यता दिलेली आहे.

ही सवलत संगणक टंकलेखन (जी.सी.सी.-टी.बी.सी.) परीक्षेसाठी मराठी/इंग्रजी/हिंदी ३० श.प्र.मि. या विषयांसाठीही लागू राहील.

२. **अपंग विद्यार्थ्यांबाबत :-** अपंग विद्यार्थ्यांना टंकलेखन कौशल्य प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अवयवांमध्ये म्हणजेच हात किंवा बोटे यामध्ये ६० टक्के किंवा त्याहुन अधीक कायमस्वरूपी अपंगत्व आलेले असल्यास व जिल्हा शल्य चिकित्सकांनी (जिल्हा सिव्हील सर्जन) तसे प्रमाणित केलेले असल्यास ३० श.प्र.मि. गतीची परीक्षा या टंकलेखनाच्या परीक्षेतील गती उताऱ्यासाठी अपंग उमेदवारास ७ मिनिटांऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ अधिक मिनिटांची सवलत देण्यास शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.: बीजीई१०९४/(७५/९४)/माशि-८, दि. ३० ऑक्टोबर, १९९५ नुसार मान्यता दिलेली आहे.

ही सवलत संगणक टंकलेखन (जी.सी.सी.-टी.बी.सी.) परीक्षेसाठी मराठी/इंग्रजी/हिंदी ३० श.प्र.मि. या विषयांसाठीही लागू राहील.

**स्वाक्षरीत/-**
**(आर. व्ही. गोधने)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे.**

# परीक्षा केंद्र समन्वयक (आय टी टीचर ) यांचेसाठी परीक्षेसंबंधी सर्वसाधारण सूचना

१. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत महाराष्ट्र व गोवा राज्यातील विविध केंद्रावरुन दिनांक २९, ३०, ३१ ानेवारी २०१६ व १ फेब्रुवारी २०१६ या चार दिवसात शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (जी.सी.सी.-टी.बी.सी. ३० श.प्र.मि.) जानेवारी २०१६ घेण्यात येणार आहे.

२. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे प्रतिनिधी म्हणून प्रत्येक केंद्रावरील या परीक्षेचे काम करताना, केंद्रसंचालकांना संबंधित केंद्राबाबतचे केंद्रसंचालनाचे अधिकार देण्यात येत आहेत.

३. सदर केंद्रावर आपली परिषदेकडून परीक्षा केंद्र समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

४. सदर परीक्षा प्रति दिवस तीन बॅचेस याप्रमाणे चार दिवसात घेण्यात येणार आहे.

५. **परीक्षा बॅचेसच्या वेळा अनुक्रमे ९.३०, १२.००, २.३० अशा आहेत. सदर परीक्षेकरीता १ तास ३० मिनीटांचा वेळ देण्यात आला आहे.**

६. परीक्षा केंद्र समन्वयक यांनी परीक्षेच्या अगोदरच्या दिवशी केंद्र संचालकांच्या समवेत सर्व संगणक व इतर सुविधा सुस्थितीत असलेबाबत तपासून खात्री करावी.

७. परीक्षेच्या दिवशी परीक्षार्थ्यांना परीक्षेची बॅच सुरु होण्यापूर्वी अर्धातास आधी परीक्षा केंद्रावर परीक्षा प्रवेशपत्र व फोटो ओळखपत्र तपासून प्रवेश द्यावा.

८. सदर परीक्षार्थ्यांना त्यांच्या संगणक स्क्रिनवरील सूचना लक्षपूर्वक वाचण्याच्या सूचना द्याव्यात.

९. परीक्षार्थ्यांच्या प्रवेशपत्रावरील व संगणकावरील प्रवेशपत्रातील फोटो व प्रत्यक्ष उपस्थित परीक्षार्थी एकच असल्याची खात्री करुनच परीक्षार्थीना लॉगीन करुन द्यावे.

१०. परीक्षेची बॅच सुरु झाल्यानंतर उशीरा आलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी देऊ नये.

११. प्रथमत: परीक्षेसाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य आपणास उपलब्ध असल्याची खात्री करावी. साहित्याबाबत काही समस्या अथवा शंका असल्यास केंद्र संचालकांमार्फत प्रथम विभागीय समन्वयक यांचेशी संपर्क करावा. त्यांचेकडून शंकेचे निरसन न झाल्यास या कार्यालयाशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

## १२. अंध/ अपंग विद्यार्थ्यासंदर्भात करावयाची कार्यवाही :-

१. शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीजीई २००१/९३९७५ (१९०/२००१) साशि - १ दिनांक १० ऑक्टोबर २००१ नुसार **अंध विद्यार्थ्यांना** वाणिज्य प्रमाणपत्र इंग्रजी टंकलेखन गति ३० शब्द प्रति मिनिट या परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक ) घेऊन बसण्यासाठी शासनाने अनुमती दिलेली आहे. तसेच शासन निर्णय

शालेय शिक्षण विभाग क्रमांक बीजीई/९३९७५(१९०/२००१) साशि-१ दिनांक ३१ डिसेंबर २००१ नुसार सनेत्र वाचकाने ( मदतनीस ) टंकलेखन परीक्षेच्या विभाग २ साठी ( गती उतारा ) ७ मिनिटाऐवजी **१० मिनिटे म्हणजेच ३ मिनिटे** अतिरिक्त वेळ देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

ही सवलत संगणक टायपिंग परीक्षेसाठी (जीसीसी - टीबीसी) मराठी / हिंदी / इंग्रजी ३० श.प्र.मि. या विषयांसाठी लागू राहील.

शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीजीई -१०९४/(७५/९४)/माशि - ८ दिनांक ३० ऑक्टोबर १९९५ नुसार **अपंग विद्यार्थ्यांना** टंकलेखन कौशल्य प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अवयवामध्ये म्हणजे हात किंवा बोटे यामध्ये **६०% किंवा त्याहून अधिक कायमस्वरुपी अपंगत्व आलेले असल्यास** व जिल्हा शल्य चिकित्सकांनी (जिल्हा सिव्हील सर्जन) तसे प्रमाणित केलेले असल्यास ३० शब्द प्रति मिनिट गतिची परीक्षा या टंकलेखनाच्या परीक्षेतील गती उताऱ्यासाठी अपंग उमेदवारास ७ मिनिटाऐवजी **१० मिनिटे म्हणजेच ३ मिनिटे** अतिरिक्त वेळ देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

ही सवलत संगणक टायपिंग परीक्षेसाठी (जीसीसी - टीबीसी) मराठी / हिंदी / इंग्रजी ३० श.प्र.मि. या विषयांसाठी लागू राहील.

## ब) केंद्रसमन्वयकांसाठी परीक्षा संबंधी सर्वसाधारण सूचना :-

१. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत राज्यातील विविध केंद्रावरुन दिनांक २९, ३०, ३१ ाानेवारी २०१६ व १ फेब्रुवारी २०१६ या चार दिवसात शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (जीसीसी टीबीसी ३० श.प्र.मि.) जानेवारी २०१६ घेण्यात येणार आहे.
२. सदर केंद्रावर आपली परिषदेकडून परीक्षा केंद्र समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
३. प्रथमत: परीक्षेसाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य आपणास उपलब्ध असल्याची खात्री करावी. परीक्षेबाबत तांत्रिक सल्लागार म्हणुन विभागीय समन्वयक यांची नेमणुक केलेली आहे, ते खालील प्रमाणे:-

| Sr. no. | Name | Region | Mob. No. | Email Id |
|---|---|---|---|---|
| 1 | YERMALKAR SACHIN | For Aurangabad & Latur region | 9420894812 | sagrolisainik@yahoo.in |
| 2 | MR. J. K. KECHE | For Amravati & Nagpur region | 9850325524 | jkkeche@gmail.com |
| 3 | Sudhir Bhosale | For Pune & Kolhapur region | 9423003512 | sudhir.stb@gmail.com |
| 4 | Satyawan Guram | For Mumbai & Nashik region | 9769494754 | g.satyawan@gmail.com |

तांत्रिक अडचणी आल्यास त्यांच्याशी संपर्क साधावा.

४. सदर परीक्षा प्रती दिवस तीन बॅचेस याप्रमाणे चार दिवसात घेण्यात येणार आहे.
५. **परीक्षा बॅचेसच्या वेळा अनुक्रमे ९.३०, १२.००, २.३० अशा असल्या तरी आपणास परीक्षा केंद्रावर सकाळी ८ वाजेपासुन उपस्थित राहणे आवश्यक आहे.**

६. **परीक्षेच्या आदल्या दिवशी दि. २८/०१/२०१६ रोजी आपण आपणाकडे नेमून दिलेल्या केंद्रावरील केंद्रसंचालकाशी व संगणक एजन्सी (Winner Software Private Ltd.) यांच्याशी संपर्क साधुन परीक्षेची संपुर्ण पुर्वतयारी करुन घ्यावी.**

७. केंद्रावरील बैठक व्यवस्थेची माहिती सूचना फलकावर विद्यार्थी, पालक यांचे माहितीसाठी दर्शनी भागावर लावावी.

८. आपल्या केंद्रावर कमाल २५ संगणकावर २५ परीक्षार्थी (एक बॅच) याप्रमाणे राहील.

९. शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा इंग्रजी, मराठी व हिंदी माध्यमातून संगणक टंकलेखनाच्या विविध गतींच्या व कौशल्याची परीक्षा आहे.

१०. परीक्षा सुरु झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा हॉल मध्ये संस्था चालकास किंवा बाहेरील इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश देऊ नये.

११. सदर परीक्षा कालावधी मध्ये विद्युत पुरवठा खंडित होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी व त्याकरीता पर्यायी व्यवस्था करावी. याबाबत परिषदेकडून आपल्या जिल्ह्याच्या कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमीटेड यांना पत्र दिले आहे.

१२. या परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी उमेदवारांनी प्रवेशपत्र आणणे आवश्यक आहे. तसेच अन्य कोणतेही फोटो ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. (उदा. पॅनकार्ड, शाळा/महाविद्यालय ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, इत्यादी)

१३. परीक्षार्थ्याला परीक्षेच्या विहीत वेळेच्या ४५ मिनिटे अगोदर परीक्षा कक्षात उपस्थित करुन घ्यावे.

१४. सदर परीक्षा संगणकावर घेण्यात येत असल्यामुळे परीक्षा सुरु झाल्यानंतर परीक्षार्थ्यास परीक्षा कक्षात प्रवेश मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

१५. परीक्षार्थीने मोबाईल फोन, कॅलक्युलेटर, पेजर इ. कोणत्याही प्रकाराचे इलेक्ट्रॉनीक साहित्य किंवा इतर कोणत्याही प्रकाराचे आक्षेपार्ह कागदपत्रे परीक्षा कालावधीत स्वत:जवळ ठेवता येणार नाही.

१६. परीक्षा कालावधीत पुरविलेल्या स्वाक्षरीपटावर परीक्षार्थीची आपल्या नाव व फोटो समोर स्वाक्षरी घ्यावी, अन्यथा परीक्षार्थीची उपस्थिती ग्राह्य धरली जाणार नाही याची परीक्षार्थीला जाणीव करून द्यावी. परीक्षा कक्षामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे कार्यरत आहेत याची परीक्षार्थींना जाणीव करून द्यावी.

१७. परीक्षा संपल्यानंतर केंद्रसंचालक व समन्वयक यांच्या परवानगीशिवाय परीक्षार्थ्यास परीक्षा कक्ष सोडता येणार नाही. तसेच संपुर्ण परीक्षा कालावधीत परीक्षार्थ्यास मध्येच परीक्षा कक्षाबाहेर सोडू नये.

१८. कोणत्याही विद्यार्थ्यास कोणत्याही कारणास्तव बॅच बदलून देऊ नये.

१९. **मराठी व हिंदी माध्यमाच्या परीक्षार्थींसाठी परीक्षा सुरु होण्यापुर्वी त्यांना परीक्षेस देण्यात आलेल्या संगणकावर आय.एस.एम. (ISM) सुरू असल्याची खात्री करावी.**

२०. **अंध/ अपंग विद्यार्थ्यांसंदर्भात करावयाची कार्यवाही :-**

**अंध विद्यार्थ्यांबाबत :-** अंध विद्यार्थ्यांना इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक) घेऊन बसण्यासाठी शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र.: बीजीई२००१/९३९७५/(१९०/२००१)साशि-१, दि. १०/१०/२००१ नुसार मान्यता दिलेली आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना सनेत्र वाचकाने (मदतनीस) वाक्य, शब्द वाचल्यानंतर ते टंकलिखीत करण्यास उशीर लागण्याची शक्यता लक्षात घेऊन टंकलेखन परीक्षेच्या विभाग २ साठी (गती उतारा) ७ मिनिटांऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यास शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र.: बीईजी२००१/९३९७५/(१९०/२००१)साशि-१, दि. ३१ डिसेंबर, २००१ नुसार मान्यता दिलेली आहे.

ही सवलत संगणक टंकलेखन (जी.सी.सी.-टी.बी.सी.) परीक्षेसाठी मराठी/इंग्रजी/हिंदी ३० श.प्र.मि. या विषयांसाठीही लागू राहील.

**अपंग विद्यार्थ्यांबाबत :-** अपंग विद्यार्थ्यांना टंकलेखन कौशल्य प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अवयवांमध्ये म्हणजेच हात किंवा बोटे यामध्ये ६० टक्के किंवा त्याहुन अधीक कायमस्वरुपी अपंगत्व आलेले असल्यास व जिल्हा शल्य चिकित्सकांनी (जिल्हा सिव्हील सर्जन) तसे प्रमाणित केलेले असल्यास ३० श.प्र.मि. गतीची परीक्षा या टंकलेखनाच्या परीक्षेतील गती उताऱ्यासाठी अपंग उमेदवारास ७ मिनिटांऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ अधिक मिनिटांची सवलत देण्यास शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.: बीजीई१०९४/(७५/९४)/माशि-८, दि. ३० ऑक्टोबर, १९९५ नुसार मान्यता दिलेली आहे.

ही सवलत संगणक टंकलेखन (जी.सी.सी.-टी.बी.सी.) परीक्षेसाठी मराठी/इंग्रजी/हिंदी ३० श.प्र.मि. या विषयांसाठीही लागू राहील.

**स्वाक्षरीत/-**
**(आर. व्ही. गोधने)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे**